३१९

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर


| सार्वजनिक आरोग्य अभियंता यांचे कार्यालय<br>फोन नं. – (०२१७) २७३५२५३<br>ईमेल – drainsmc@gmail.com | | "इंद्रभुवन", पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन, सोलापूर – ४१३ ००१ |
|---|---|---|


प्रति,
विभागीय अधिकारी,
विभागीय कार्यालय क्र. १ ते ८
सोलापूर.

सार्व. आरोग्य अभियंता
जावक क्र./सा.आ.अ./ना.नी. ९२० ८
दिनांक २/२/१८

**विषय** - **केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजना योजनेचे नकाशे सादर करणेबाबत...**

**संदर्भ** - मा. आयुक्त यांचे दि. १८/०१/२०१८ रोजीचे समक्षतेत आदेश

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरून, केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजना अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजना मंजूर असून सदर योजनेता खालील भागांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**ड्रेनेज झोन क्र. ९** - विमानतळ पाठीमागील बाजू, नई जिंदगी परिसर, देसाई नगर, निलम नगर, शांती नगर, विनायक नगर, आकाशवाणी केंद्र, आदर्श नगर, सुनिल नगर, लक्ष्मीनारायण टॉकिज, सुनिल नगर, नवीन घरकूल रोड परिसर इ. परिसर - पुर्ण परिसर

**ड्रेनेज झोन क्र. १०** - संगमेश्वर नगर, मल्लिकार्जुन नगर वज्रेश्वरी नगर, गांधी नगर, जूना अक्कलकोट नाका, कल्पना नगर, रंगराज नगर, हैद्राबाद रोड, जूना विडी घरकूल, कोंडा नगर, केकडे नगर, सग्गुम नगर, जवाहर नगर इ. परिसर - पुर्ण परिसर

**ड्रेनेज झोन क्र. ११** - कुमारस्वामी नगर, दहिटणे गावठाण, हैद्राबाद रोड परिसर, मित्रनगर शेळगी, शेळगी दहिटणे रस्ता परिसर, शेळगी गावठाण ते रघोजी ट्रान्स्पोर्ट कोपरा, बक्षी हिप्परगा हद्द, हिप्परगा हद्द इ. परिसर - फक्त मेन ट्रंकलाईन

**ड्रेनेज झोन क्र. १२** - बाळे गावठाण, पूणे रोड परिसर, पांढरेवस्ती, कारंबा नाका, बार्शी रोड परिसर, भोगाव-मार्डी रस्ता परिसर इ. परिसर - फक्त मेन ट्रंकलाईन

**ड्रेनेज झोन क्र. १३** - देगाव गावठाण, मंगळवेढा रोड परिसर, शेळके वस्ती, मरी आई चौक परिसर इ. परिसर - फक्त मेन ट्रंकलाईन

**ड्रेनेज झोन क्र. १ ते ६** - शहरातील गावठाण भाग - फक्त मेन ट्रंकलाईन

सोबत नकाशात दर्शविल्याप्रमाणे ड्रेनेज पाईपलाईन टाकणेचे काम मंजूर आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून निविदा त्वरीत अंतिम होणार आहे.

तरी आपले कार्यक्षेत्र अंतर्गत उक्त नमुद भागात मनपा अथवा इतर शासकीय निधीतून नव्याने ड्रेनेज व रस्त्याची कामे प्रस्तावित करण्यात येवू नयेत. मंजूर योजनेतील ड्रेनेज झोन नकाशाचे शहानिशा करूनच ड्रेनेज लाईनची कामे प्रस्तावित करावीत.

तसेच दि. १८/०१/२०१८ रोजीचे मा. आयुक्त यांचे आदेशानूसार आपले विभागांतर्गत पूर्ण झालेले, प्रगतीपथावरील व प्रस्तावित ड्रेनेज पाईपलाईन कामाची माहिती सोबत नकाशामध्ये नमुद करून या कार्यालयाकडे सादर करावी.

**सोबत - नकाशा**

**प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका**

प्रत - मा. आयुक्त यांचेकडे सविनय सादर

D:\AMRUT 200\Zone 1 to 8.doc



Scanned by CamScanner